**मधुक्रांती - २०२३**

दुसऱ्या
हरितक्रांतीसाठी
करुया
मधुक्रांती



'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित आणि 'पूर्वा केमटेक प्रा.लि.'च्या सहयोगाने, 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र' पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे कार्यान्वित झाले आहे. या माध्यमातून २०१९ पासून मधुमक्षिका पालन- संवर्धन क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असलेला राज्यस्तरीय परिसंवाद आयोजिला जातो. तसेच यानिमित्ताने या क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्यांना 'बसवंत मधुक्रांती' पुरस्काराने गौरविण्यात येते.

या परंपरेला अनुसरून, यंदा आयोजिलेला 'बसवंत मधुक्रांती-२०२३' हा परिसंवाद या क्षेत्रातील तज्ञ तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि. २० आणि २१ मे असे दोन दिवस संपन्न होणार आहे. 'मधु-व्यवसाया'त आपापल्या कार्यक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती तसेच संस्थेचा गौरव प्रस्तुत कार्यक्रमाच्या दरम्यान केला जाणार आहे. या सत्कारमूर्तींचा सचित्र परिचय पुढे देत आहोत.

## योगदान

पुरस्कार : विस्तारकार्य (श्रेणी : संस्था)



श्री. सुनील चंद्रकांत भालेराव

# आदिवासीबहुल विभागात शास्त्रीय तंत्राने मधु-प्रशिक्षण

**शिवस्फूर्ती प्रोसेसिंग फाऊंडेशन**

**संचालक:** श्री. सुनील चंद्रकांत भालेराव
(मो.नं. ९६०४४४१५५५)
बी.ए. (वय ५३)
मु.पो. शहापूर, ता. चिखलदरा,
जि. अमरावती

शिवस्फूर्ती प्रोसेसिंग फाऊंडेशन, स्फूर्ती क्लस्टर, शहापूर, ता. चिखलदरा (जि. अमरावती) या संस्थेचे सुनील चंद्रकांत भालेराव हे संचालक आहेत. सन २०१८ मध्ये आदिवासीबहुल क्षेत्रातील चिखलदरा तालुक्यात या संस्थेचे कामकाज सुरू झाले.

मधमाशी पालनाच्या प्रसार व प्रचाराचे कार्य संस्था सन २०१६ पासून करते. आदिवासी बांधवांना शास्त्रोक्त पद्धतीचे मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच त्यांच्याकडून मधसंकलन देखील केले जाते.

या संस्थेच्या माध्यमातून आजपावेतो १२० आदिवासी कुटुंबांना लाभ झाला असून, मधविक्रीतून त्यांना रोजगारही प्राप्त झाला आहे. मधमाशी पालनासाठी काम करणाऱ्या या संस्थेला खादी व ग्रामोद्योग आयोग (भारत सरकार) आणि आदिवासी विकास प्रकल्प धारिणी या संस्थांनी सहकार्य केलेले आहे.

प्रामुख्याने हा परिसर आदिवासीबहुल असल्याने स्थलांतर न करणे, ही या विभागातील प्रमुख समस्या आहे. त्यासाठी जंगलातील पोळी काढण्यासाठी व्याघ्र प्रकल्प- मेळघाट यांच्यासोबत सहयोग- साहचर्याचा करार (एम.ओ.यू) करावा लागला. भारत सरकारच्या स्फूर्ती क्लस्टरच्या माध्यमातून मध व मेणाच्या विविध उत्पादनांची निर्मिती करून विक्री वाढविणे हे या संस्थेचे

मुख्य उद्दिष्ट आहे.

मधमाशी पालनामध्ये 'शिवस्फूर्ती प्रोसेसिंग फाऊंडेशन'ने केलेले उल्लेखनीय काम, त्याचप्रमाणे या प्रयत्नांना मिळालेल्या प्रतिसादाबद्दल बोलताना श्री. सुनील भालेराव म्हणाले की- खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत आदिवासी बांधवाना मधुवसाहतींचे वाटप करण्यात आले. या संस्थेकडून आदिवासी बांधवांनी जमा केलेल्या आग्या मधमाश्यांच्या मधाचे संकलन केले जाते. यासाठी त्यांना संस्थेने रीतसर शास्त्रीय प्रशिक्षण दिले आहे. तसेच टूलकीटचे वाटपही केलेले आहे.

आजपावेतो सुमारे सव्वाशे आदिवासी परिवार मधुसंकलनाचे काम यशस्वीपणे करीत आहेत, याचे समाधान वाटते. ■

---

**योगदान** पुरस्कार : विस्तारकार्य (श्रेणी : व्यक्ती)

# कार्यशाळा तसेच डिजिटल माध्यमांतून मधुपालन उद्योगाचा प्रसार


**श्री. दयावान श्रीकांत पाटील**
(मो.नं. ९०९६३८५७१२)
एम.ए. (वय २८)
मु.पो. कणेरी मठ,
ता. करवीर, जि. कोल्हापूर




श्री. दयावान श्रीकांत पाटील

श्री. दयावान श्रीकांत पाटील हे पर्यावरणीय सामाजिक कार्य २०१० पासून करत आहेत. त्यांची मुख्य उद्दिष्टे शेतीची उत्पादकता वाढविणे, मधमाश्यांद्वारे निसर्गातील परागीभवन वाढविणे, लोकांसाठी मधमाशी पालन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करणे, युवकांना मध उत्पादनात उद्योगशील बनविणे, आग्या मधमाशीचे संवर्धन करणे, संशोधनात्मक प्रयोग करणे अशी आहेत.

ते मधमाशी पालन व्यवसायाचा प्रसार शैक्षणिक कार्यशाळा आणि प्रशिक्षण, शेतकरी वर्गासोबत चर्चासत्रे तसेच ऑनलाईन जाहिराती या संकल्पनांतून करतात. 'मधुअमृत' या त्यांच्या संस्थेमार्फत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जवळपास ५०० शेतकरी आणि ५०० विद्यार्थ्यांना शेतीची उत्पादकता वाढविणे, निसर्गातील परागीभवन वाढविणे, युवकांना मध उत्पादनात उद्योगशील बनविणे, आग्या मधमाश्यांचे संरक्षण-संवर्धन करणे याकरिता संशोधनात्मक प्रयोगांमधून त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

या क्षेत्रात काम करत असताना मधमाशीच्या पेटीतील वसाहतीला मेणकिडा लागण्याच्या समस्येला बऱ्याच वेळा तोंड द्यावे लागते. त्यासाठी सातत्याने पेटीची स्वच्छता करणे, जुनी पोळी काढून टाकणे इत्यादी उपाययोजना ते करतात. तसेच जंगलातील अस्वलांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पेट्या झाडाला टांगून ठेवणे, टॉर्चचा वापर करून वसाहतींचा बचाव करणे अशा उपाययोजना देखील ते करतात. मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी मध उत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळवून देणे, हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. तसेच पीक उत्पादन वाढविण्यासाठी मधमाशी पालनाचा प्रचार करणे, ही देखील त्यांची भावी योजना आहे. मधमाशी पालन व्यवसायाबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले की, अलीकडच्या काळात कोल्हापूर जिल्ह्यात मधमाशी पालन करणाऱ्यांची संख्या आणि या व्यवसायाबद्दल आत्मीयता वाढली आहे. मधमाशीला संरक्षण देण्याच्या दृष्टीने सकारात्मकता तरुणांमध्ये दिसते. मधमाशी पालन आणि मध उत्पादन व्यवसायाचे महत्त्व त्यांना पटले आहे. मधमाशी पालन आणि संवर्धनाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळू लागला आहे. श्री. पाटील यांच्या संस्थेला सकाळ पुरस्कार, सिद्धेगिरी मठ पुरस्कार असे अनेक नामांकित पुरस्कार आणि सन्मान लाभलेले आहेत. ■

**योगदान** पुरस्कार : उद्योजक श्रेणी (विभाग : उत्तर महाराष्ट्र)

# शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन केला 'हायटेक' मधुउद्योगाचा श्रीगणेशा!


श्री. ऋषिकेश हरिभाऊ औताडे
एम.एस्सी.- जैवतंत्रज्ञान, (वय : ३६)
मो.नं. ९९६०५५३४०७
मु. इंदिरानगर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर




श्री. ऋषिकेश हरिभाऊ औताडे

श्री. ऋषिकेश हरिभाऊ औताडे यांनी बायो-टेक्नॉलॉजीसारख्या आव्हानात्मक विज्ञान शाखेतून पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी.) प्राप्त केली आहे. कृषी क्षेत्रातील सर्वाधिक महत्त्वाची 'जैविक निविष्ठा' मानल्या गेलेल्या मधमाशीशी निगडित उद्योगाचा मार्ग निवडावा अशी धारणा होण्यामागे; जैव तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण घेतल्याची पार्श्वभूमी असावी हा एक 'मधुर योग'च म्हणायला हवा! त्यांच्या या उद्योगाचा शुभारंभ २०२१ च्या डिसेंबरपासून झाला. श्रीरामपूरमध्ये त्यांची 'गोदागिरी फार्म्स' नावाची मधुपालन संस्थाही आहे.

श्री. औताडे यांनी व्यवसाय म्हणून मधमाशी पालनाची निवड केल्यानंतर; पुण्याच्या मधुमक्षिका संशोधन व प्रशिक्षण संस्थेतून एक महिन्याचे मधमाशी पालनाचे- तसेच एकदिवसीय मध तपासणीचे रीतसर प्रशिक्षण घेतले. त्याचप्रमाणे महाबळेश्वरस्थित खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मध संचालनालयातून दहा दिवसांचे मधपाळ प्रशिक्षणही पूर्ण केले. 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक तथा ज्येष्ठ कृषिवैज्ञानिक डॉ.श्री. भास्कर गायकवाड यांचे मधुपालनाच्या संदर्भातील वृत्तपत्रांतील काही लेख वाचनात आले. त्यातील वैशिष्ट्यपूर्ण विश्लेषणामुळे या विषयी उत्सुकता वाढली. तीच मधु-उद्योजक होण्यामागची प्रेरणा ठरली, असे श्री. औताडे यांनी आवर्जून नमूद केले. तसेच 'सीबीआरडीटी' येथील माजी सहसंचालक डेझी थॉमस यांनीही ट्रायगोना मधमाशीविषयी सखोल मार्गदर्शन केल्याचे ते म्हणाले.

मधमाशी पालन व्यवसाय सुरू केल्यावर त्यांनी एपिस मेलिफेरा, एपिस सेरेना व ट्रायगोना जातींच्या मधुपेट्यांचा परागीभवनासाठी पुरवठा अहमदनगर येथील टरबूज, डाळिंब, कांदा बियाणे व आंबा बागेसाठी केला. तसेच रायगडमध्येही आंबा बागेसाठी भाडेतत्त्वावर पेट्या दिल्या. भाडेतत्त्वावर मधमाशी पेट्या देण्यापूर्वी संबंधित शेतकरी, व्यावसायिक यांना मधमाशी पालनाचे प्राथमिक प्रशिक्षण दिले. त्यामुळे त्यांनी पेटीची काळजी तर घेतलीच, त्याचबरोबर शेतामध्ये नैसर्गिक मधमाश्या संगोपन देखील सुरू केले, असे श्री. औताडे यांनी सांगितले.

मराठी भाषेमध्ये सोशल मीडियावर मधमाशी पालनाविषयी खूपच कमी माहिती टाकली जाते. म्हणूनच मधमाशी पालन करतानाचे दैनंदिन अनुभव व माहिती आपण यूट्यूब, फेसबुक, लिंक्डइन, इन्स्टाग्राम, ट्विटर, वेबसाईट व ब्लॉगद्वारे प्रदर्शित करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सद्य:स्थितीत त्यांच्याकडे २७ एपिस मेलिफेरा, २० ट्रायगोना व ३२ एपिस सेरेना वसाहती आहेत. याद्वारे त्यांनी नेवासा (३), श्रीरामपूर (८), राहाता (५), राहुरी (९), रायगड-म्हसाळा (१), पैठण (१), कोपरगाव (१), अहमदनगर (३), संगमनेर (१) अशा विविध गावांमध्ये परागीभवन सेवा दिली आहे.

मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी भावी योजना सांगताना ते म्हणाले की, बऱ्याच शेतकऱ्यांची परागीभवन करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या पेटीमध्ये फसवणूक होते किंवा जास्तीचे पैसे घेतले जातात. ओला- उबर या ट्रॅव्हल कंपन्या जशी 'रिअल टाईम लोकेशन बेसिस'वर रिक्षा, कार बुक करण्याची सोय करून देतात, त्या धर्तीवर ऑनलाईन पेटी बुकिंग सुविधा, मोबाईल ॲप व वेबसाईट उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. याद्वारे इतरही मधमाशी पालक त्या ॲपमध्ये नोंदणी करून आपली सेवा देऊ शकतील व चांगली सेवा देणारे मधमाशी पालकच पुढील काळात शेतकऱ्यांच्याद्वारे पुढे आणले जातील. ■

**योगदान** पुरस्कार : उद्योजक श्रेणी (विभाग : विदर्भ)

# स्थलांतरित मधमाशी पालनातून व्यवसाय वृद्धीकडे वाटचाल


योगिता प्रभाकर इंगळे
(मो.नं. ९७६६२३३३६५)
एम.ए., बी.एस्सी. (कृषी) (वय ३४)
मु.पो. मार्कंडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती




योगिता प्रभाकर इंगळे

योगिता प्रभाकर इंगळे या २०१८ पासून ‘हनी मिशन’ अंतर्गत मधमाश्यांच्या वसाहतींचे पालन करतात. त्यांच्याकडे एपिस मेलिफेरा जातीच्या १२० वसाहती आहेत. शेतीपिकांचे परपरागीभवन तसेच मध, मेण, परागकण यांची विक्री करणे या प्रमुख उद्देशाने त्यांनी मधमाशी पालन व्यवसायाचा अंगीकार केला आहे. त्या दरवर्षी स्थलांतरित मधमाशी पालन करून साधारणपणे ३६०० किलो मध उत्पादन घेतात.

योगिता इंगळे या परागीभवनासाठी ५० वसाहतींचा पुरवठा करतात. संत्रा, शेवगा, कांदा, टरबूज अशा पिकांना त्या पेट्या भाड्याने देतात, त्यांचा किमान १० ते २० शेतकरी लाभ घेतात. मधाचे उत्पादन झाल्यानंतर विक्री व्यवस्थेबद्दलचे नियोजन करताना ‘गॉर्जेस हनी’ या ब्रॅण्ड नावाने विक्री केली जाते, असे इंगळे यांनी सांगितले. तसेच अमरावती शहरात विक्री- वितरणाची सुविधा उपलब्ध आहे, असेही त्या म्हणाल्या. हा व्यवसाय करण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून अनुदान मिळाले तसेच केंद्रचालक म्हणून त्यांना ५० वसाहती मिळाल्या.

या व्यवसायामध्ये आपले पुढील नियोजन काय आहे, असे त्यांना विचारले असता- वसाहतींची संख्या वाढविणे, ब्रीडिंग करणे, केंद्रचालक म्हणून जिल्ह्यात सुसज्ज प्रशिक्षण केंद्र उभारणे असे भविष्यकालिन नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. स्थलांतरित मधमाश्या पालनातून अधिक फायदा दिसून येतो. शासकीय योजनेच्या माध्यमातून महिलांना मधुर व्यवसाय संधी उपलब्ध होऊ शकते, असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. ■

---

**योगदान** पुरस्कार : उद्योजक श्रेणी (विभाग : मराठवाडा)

# तरुण वयातच उचलले उद्यमशीलतेचे शिवधनुष्य


श्री. तेजस सहदेव लिमकर
(मो.नं. ९०२२८९६८०३
कृषी पदवी (वय २१)
मु.पो. रुई, परांडा, धाराशिव (उस्मानाबाद)




श्री. तेजस सहदेव लिमकर

श्री. तेजस सहदेव लिमकर हे गेल्या दीड वर्षापासून मधमाशी पालन व्यवसाय करीत आहेत. त्यांच्या वयाचा विचार करता, खूपच कमी वयात त्यांनी या व्यवसायाचे शिवधनुष्य उचलले आहे. त्यांच्याकडे सध्या एपिस मेलिफेरा या जातीच्या मधमाश्यांच्या ४० वसाहती आहेत. मधमाशी पालनापासून शेती उत्पादनात वाढ व मधमाश्यांचे संवर्धन साध्य करणे हा लिमकर यांचा प्रमुख उद्देश आहे.

आपण दरवर्षी मधाचे जवळपास ११०० ते १४०० किलो उत्पादन घेतो. शेतकऱ्यांना पीकवृद्धीसाठी मधमाश्यांच्या वसाहती देतो तसेच डाळिंब आणि कांदा बीज उत्पादनासाठीही वसाहती देतो. स्वत:चा ‘तेजविकास हनी’ या नावाचा ब्रॅण्ड आहे व कृषिक्रांती ॲपवर त्याची जाहिरातही करतो, असे श्री. लिमकर म्हणाले.

हा व्यवसाय करण्यासाठी त्यांना जिल्हा उद्योग केंद्राकडून मदत मिळाली आहे. मधमाशी पालन व्यवसाय करताना वसाहती वाढवणे व मध विक्री तसेच मधमाशीचे संवर्धन, प्रचार- प्रसार करणे हे नियोजन असल्याचे ते सांगतात. मधमाशी पालन हा अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय असून आपण या व्यवसायातून आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होऊ शकतो, असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. ■

## योगदान पुरस्कार : उद्योजक श्रेणी (विभाग : प. महाराष्ट्र)

# निसर्ग संवर्धनातून रोजगार निर्मितीचा वसा

**ज्योत्स्ना जयवंतराव देसाई**
(मो.नं. ९९२११८२५९२)
बी.एस्सी.- बायोटेक्नॉलॉजी (वय २६)
मु.पो. अर्जुनवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



ज्योत्स्ना जयवंतराव देसाई

ज्योत्स्ना जयवंतराव देसाई या अगदी लहानपणापासूनच या व्यवसायाकडे आकर्षित झाल्या कारण त्यांचे वडील १९९५ पासून हा व्यवसाय करीत आहेत. २०१९ पासून त्या पूर्णवेळ हा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे आजमितीस सातेरी १२७, मेलिफेरा २०० आणि ट्रायगोना २८ अशा वसाहती आहेत.

मधमाशी पालन करण्याचा आपला प्रमुख उद्देश कोणता, असे देसाई यांना विचारले असता- मधमाशी पालनातून परागीभवनाद्वारे निसर्गसंवर्धन साधणे तसेच या व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे असा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. त्या दरवर्षी सातेरी मधमाश्यांद्वारे सुमारे ८०० किलो मधाचे उत्पादन घेतात.

त्यांच्याकडील वसाहती त्या शेतकऱ्यांनाही परागीभवनासाठी देतात. २५ वसाहतींची देवाण-घेवाण करतात. शेवगा, मोहरी, सूर्यफूल या पिकांसाठी जवळपास ५ ते १० शेतकऱ्यांना पेट्या परागीभवनासाठी त्या नेहमी देत असतात. 'मधुऐश्वर्य' या नावाने त्यांनी स्वत:चा ब्रॅण्ड विकसित केला आहे. त्यांच्याकडील मध त्या बाजारपेठेत न विकता, ग्राहकच त्यांच्या घरून घेऊन जात असतात.

या व्यवसायामध्ये आपले पुढील नियोजन काय आहे, असे विचारले असता- वसाहतींची संख्या वाढवणे व मधमाश्यांची परागीभवनातील महत्त्वपूर्ण भूमिका किती उपयुक्त आहे यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणार असल्याचे त्या म्हणाल्या. या व्यवसायाबद्दलची आपली एकूण प्रतिक्रिया काय, असे विचारले असता- मुख्य म्हणजे पर्यावरण संवर्धन, परागीभवनातून कृषी उत्पादन वाढ आणि त्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ३०- ४० टक्के वाढ साध्य होते. म्हणूनच मधमाश्यांबद्दल महाराष्ट्रात जाणीव-जागृती निर्माण व्हायला हवी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ■

---

## योगदान पुरस्कार : उद्योजक श्रेणी (विभाग : कोकण)

# वडिलोपार्जित व्यवसायातून मिळाली मधुपालनाची प्रेरणा

**श्री. राजू इर्शद मंडळ**
(मो.नं. ९९२३७१३६७८)
शिक्षण : ९ वी (वय : ५२)
मु.पो. कोसबाड (चिंबावे), ता. डहाणू, जि. पालघर



श्री. राजू इर्शद मंडळ

श्री. राजू इर्शद मंडळ हे ४० वर्षांपेक्षा अधिक काळापासून मधमाशी पालन व्यवसाय करीत आहेत. त्यांच्याकडे सध्या सातेरी जातीच्या ४० वसाहती तर कोती (ट्रायगोना) जातीच्या २० वसाहती आहेत.

मधमाशी पालन व्यवसाय करण्याचा आपला प्रमुख उद्देश कोणता, असे त्यांना विचारले असता- मधमाशी पालन हा आमचा वडिलोपार्जित व्यवसाय तसेच माझा छंद होता, माझे वडील मधमाशी पालन करत होते. घोवड बोर्डी परिसरातील शेतकऱ्यांच्या घरी जाऊन मधमाश्यांच्या पेट्यांची साफसफाई करणे, मध काढून देणे, याबाबत माहिती आणि सेवा देणे अशी कामे ते करायचे. त्यांच्याकडून लहानपणापासूनच मी हा व्यवसाय शिकलो. हळूहळू कामाला सुरुवात केली. आता 'साईकृपा हनी उद्योग' या नावाने पेट्या बनविणे, मधमाश्यांच्या वसाहती पुरवणे आणि मधाची विक्री तसेच पेटी साफसफाई करण्याची सशुल्क सेवा देणे अशा प्रकारे माझा व्यवसाय सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

मंडळ हे दरवर्षी सातेरी माश्यांपासून सुमारे २०० किलो मध घेतात. पेट्या स्थानिक- गावातच असतात. ते पेट्यांचे स्थलांतर करीत नाहीत. या भागात परागीभवनासाठी शेतकरी फारसे उत्सुक नाहीत. मात्र कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने मागील वर्षी १० पेट्या परागीभवनासाठी लिची बागेत त्यांनी दिल्या होत्या. त्यातून त्यांना २० हजार रुपये मिळाले होते. यावर्षी २० ते ३० पेट्या भाडेतत्त्वावर परागीभवनासाठी देण्याचे त्यांचे नियोजन आहे. ते संपूर्ण मधाची घरी राहूनच विक्री करतात. डहाणू परिसरात अनेक कृषी पर्यटन केंद्रे आहेत. यातील पर्यटक घरी येऊन मध खरेदी करतात. कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने ब्रँड आणि लायसेन्सच्या दृष्टीने त्यांचे काम सुरू आहे. वर्षाकाठी सातेरी माशीच्या सरासरी ३०० ते ३५० पेट्या आणि कोती माशीच्या ५० पेट्या ते तयार करतात. यातील काही रिकाम्या पेट्यांची तर १५० च्या आसपास भरलेल्या पेट्यांची विक्री करतात. या पेट्यांची पालघरमध्ये तसेच ठाणे, नाशिक, रत्नागिरी, रायगड, अहमदनगर या जिल्ह्यांतही विक्री केली जाते. यातून त्यांना ४ ते ५ लाख रुपये नफा मिळतो.

हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी कोणत्याही संस्थेकडून अर्थसाह्य अथवा अनुदान घेतलेले नाही. पेट्या बनविण्याची गती वाढविणे तसेच वसाहतींचे विभाजन करून नवीन वसाहती निर्माण करणे, असे पुढील नियोजन असल्याचे ते म्हणाले. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात आणि घराजवळ मधपेटी ठेवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनात, पर्यायाने उत्पन्नात वाढ होईल असे ते सांगतात. हा व्यवसाय करताना मला पत्नी आणि मुलाची चांगली मदत मिळते.

मधमाशी पालन व्यवसाय आता माझ्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन बनले असून, मला चांगला रोजगार देत आहे. त्याचप्रमाणे जे शेतकरी पेट्या घेऊन जातात त्यांच्या शेतीमधील पिकांचे उत्पादनही वाढत आहे. यातून एकूणच शेतकऱ्यांचा विकास होत आहे. अशा प्रकारे निसर्गाचे संवर्धन होऊन देशाचे उत्पन्नही वाढते आहे याचे मला मोठे समाधान वाटते, असे त्यांनी नमूद केले. ■

## मधु-उद्योगात मध काढणीचा कालावधी महत्त्वाचा असतो...

**म**ध काढणीचा काळ अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण वसाहतीमध्ये मधाचे जास्त प्रमाण झाले तर मधमाश्या स्वत: मध पिऊन घेतात आणि नवीन मधाला जागा तयार करतात. म्हणूनच वेळोवेळी मधमाश्यांच्या वसाहतीचे निरीक्षण करावे. ज्यावेळी मध काढण्यास तयार होते त्यावेळी माश्या जास्त प्रमाणात आक्रमक होतात आणि कोणीही पेटीजवळ गेला तर त्याला चावण्याचा प्रयत्न करतात. तसेच पेटीच्या बाहेरच्या बाजूला जास्त प्रमाणात मधमाश्या घोंगावतात. मोठ्या प्रमाणात फुलोरा असेल तर १० दिवसांनंतर मध काढणीसाठी तयार होतो. मधमाश्यांच्या पोळ्यामधील मध काढल्यानंतर शेतीतील फुलोऱ्याच्या उपलब्धतेनुसार मधाच्या उत्पादनामध्ये सातत्य राहते. त्यानुसार मधाची काढणी करावी तसेच मधाच्या कॉलनीचे निरीक्षण करावे, जेणेकरून उत्पादन मिळत असताना मधमाश्यांच्या वसाहतीमध्ये योग्य प्रकारे कार्य सुरू आहे की नाही याची पाहणी करता येते.

मधमाश्यांपासून मध निर्मितीचा सर्वात महत्त्वाचा कालखंड म्हणजे ऑक्टोबर ते मार्च हे सहा महिने. काही प्रांतांमध्ये मे महिन्यापर्यंत फुलोरा उपलब्ध असतो. म्हणजेच वर्षातले ६ ते ८ महिने मधमाश्यांपासून मधाचे उत्पादन घेण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावा लागतो. बाकीच्या ४ ते ६ महिने कालावधीत या पेट्यांना जेथे थोडाफार फुलोरा असतो तेथे स्थलांतरित करावे लागते किंवा कृत्रिमरित्या खाद्य- पाणी देऊन आणि फुलोरा देणाऱ्या काही पिकांची लागवड करून मधमाश्यांचे संगोपन करावे लागते. अनेकदा बाहेर फुलोरा कमी झाल्यानंतर मधमाश्यांना मध आणि परागकण मिळत नाही. त्यामुळे मधमाश्या उपलब्ध मधाच्या साठ्याच्या वापराबाबत नियोजन सुरू करतात. नको असलेल्या नर माश्यांना वसाहतीच्या बाहेर काढून देतात. तसेच राणी माशीला अंडी घालण्यापासून परावृत्त करतात आणि तिने अंडी घातलीच तर तयार झालेल्या अळ्यांना खाद्य देत नाहीत. मधमाश्या बाहेर जात नाहीत, त्यामुळे त्यांच्यामध्ये उत्साह राहात नाही. या सर्वांचा परिणाम म्हणजे मधमाश्यांची वसाहत रोडावू लागते किंवा माश्या वसाहत सोडून जातात. उपलब्ध मधाची चोरी इतर माश्या करतात. निरुत्साही झालेल्या माश्यांना रोग होतो किंवा त्यांना परभक्षी कीटक खातात. यातून वसाहत पूर्णपणे कोलमडते. ही बाब मधमाशी पालकांसाठी चांगली नाही म्हणून अशा काळात मधमाशीचे प्रजनन सुरू ठेवून त्यातून माश्या तयार होणे आणि वसाहत मजबूत राहाण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेवटचे मध काढताना मधमाश्यांच्या पेटीतील वसाहतीमध्ये मधमाश्यांसाठी भरपूर प्रमाणात मध राहील याची काळजी घ्यावी. तसेच मधमाश्यांना कृत्रिम खाद्य आणि पाण्याची सोय केली तर वसाहती नवीन हंगाम सुरू होण्यापर्यंत चांगल्या राहतील आणि परत त्यांच्यापासून नव्या जोमाने काम करून घेता येईल. **(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■